पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/३१९/२०१०
दिनांक- ४/०३/२०१०

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ९.३.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ९.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १५९

दिनांक- ९.३.२०१० वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ९.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक १७.२.२०१०, १८.२.२०१०, २३.२.२०१० व २६.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५४) सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २३.२.२०१० व २५.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५५) सभावृत्तांत कायम करणे.
क) दिनांक २.३.२०१० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५६) सभावृत्तांत कायम करणे.
ड) दिनांक २३.२.२०१०, २६.२.२०१० व २८.२.२०१० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५७) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) वॉर्ड क्र.५९ वाल्हेकरवाडी मधील गुरूव्दारा ८० फुटी रस्त्यावरील खांब व तारा हलविणे या कामासाठीचे विज पर्यवेक्षण शुल्क र.रू.१७,३२०/- [र.रू.सतरा हजार तीनशे वीस] म.रा.वि. वि.कं.लि. यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) वॉर्ड क्र.५९ वाल्हेकरवाडी मधील भोंडवेवस्ती वाहिनीचे खांब व तारा हलविणे या कामासाठीचे विज पर्यवेक्षण शुल्क र.रू.४९,५००/- [र.रू.एकोणपन्नास हजार पाचशे] म.रा.वि. वि.कं.लि. यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) विद्युत ब प्रभागातील वीज संच मांडणीचे कामासाठीचे विद्युत निरिक्षण फी र.रू.१४,४५०/- [र.रू.चौदा हजार चारशे पन्नास] विद्युत निरिक्षक, पुणे यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या गणवेश देय कर्मचाऱ्यांना पादत्राणे खरेदी करणेकामी लघुत्तम निविदाकार मे.पार्श्व सप्लायर्स, भोसरी यांचेकडून पादत्राणे साहित्य र.रू.९,१८,४५५/- व मे.पद्मयोग, पुणे यांचे कडून पादत्राणे साहित्य र.रू.७,२००/- असे एकूण र.रू.

९,२५,६५५/- [र.रू.नऊ लाख पंचवीस हजार सहाशे पंचावन्न] मध्ये खरेदी करण्यात आलेल्या करारनाम्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ५) मनपाचे औ.प्र.केंद्र, मोरवाडी विभागासाठी रॉ मटेरियल साहित्य खरेदीकामी ई-नि.क्र.३/२००९-१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांचे रॉ मटेरियल (१४६ ॲटम) साहित्याचे दर एकूण र.रू.२,२१,१००/- [र.रू.दोन लाख एकवीस हजार शंभर] व मे.एम.पी.एल. इंजिनिअरींग, चिंचवड यांचे रॉ मटेरियल (८ ॲटम) साहित्याचे दर एकूण र.रू.३,१७७=५० [र.रू.तीन हजार एकशे सत्याहत्तर रूपये पन्नास पैसे] स्विकृत करून, करारनामा केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ६) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१.२.२०१० ते दि.७.२.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१३/२०१० दि.२५.२.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ७) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.८.२.२०१० ते दि.१४.२.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१५/२०१० दि.२५.२.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ८) पिंपरी चिंचवड मनपा संघातील खेळाडूंसाठी क्रिकेटचे साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून त्यानुसार, प्राप्त झालेल्या सर्वात कमी किंमतीच्या पुरवठाधारका कडून [मे.हरिओम स्पोर्टस सांगवी] खरेदी करण्यात आलेल्या असल्याने सदरच्या र.रू.४६,९१०/- [र.रू.शेहचाळीस हजार नऊशे दहा] च्या खर्चास तसेच सदरचा खर्च क्रीडा निधीमधील क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) सन २००८-०९ व २००९-१० मध्ये प्रत्येकी एक फायरमन कर्मचाऱ्यांनी सब ऑफीसर पदाचे प्रशिक्षण राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई या संस्थेकडून घेतले असल्याने प्रशिक्षण प्राप्तीच्या वरील दोन वर्षाचे प्रत्येक वर्षाचे र.रू.१,००,०००/- प्रमाणे र.रू.२,००,०००/- राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई

यांना वार्षिक अनुदान अदा करणेस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) मनपाच्या वतीने दि.३/२/२०१० रोजी यशदा, पुणे यांचेमार्फत ट्रेनी आय.ए.एस. अधिकारी यांचा मनपा कामकाजा संदर्भात अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मान्यवरांना भोजन व्यवस्था हॉटेल कलासागर येथे करण्यात आली होती. भोजन व्यवस्थेपोटी र.रू.८,४२०/- [र.रू.आठ हजार चारशे वीस] खर्च झालेला असल्याने सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/२००९-१० अन्वये, ड प्रभागातील पाण्याच्या टाकीवरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्था ठेकेदार पध्दतीने करणेकामी मे.दिलिप विठ्ठल नाणेकर लेबर अँड सिक्युरिटी सर्व्हिसेस (प्रतिमहा र.रू.३,४५,७२१/- [र.रू.तीन लाख पंचेचाळीस हजार सातशे एकवीस] या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.५८,५४,०००/-)

विषय क्रमांक- १२) सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांचेकडून ३ महिने कालावधीसाठी GISDA Application चे देखभाल व दुरुस्तीचे कामकाज करारनामा न करता व थेट पध्दतीने करून घेणेस आणि त्याकामी येणाऱ्या एकुण र.रू.६,३०,०००/- [र.रू. सहा लाख तीस हजार] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मा.महापालिका सभा ठराव दि.१९/१/२०१० अन्वये, मनपाच्या भागशः मंजुर विकास योजनेतील मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं.६२ पै, ६३ पै व ६६ पै यामधील आ.क्र. २/४३ उंच पाण्याची टाकी या प्रस्तावाने बाधित होणाऱ्या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भुसंपादन कायदा १८९४ तरतुदीतील तातडीचे कलमासह भूसंपादन करणेस मान्यता दिलेली असल्याने या भूसंपादनास व याकामी येणाऱ्या खर्चास (संबंधीत भूमीसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) मनपास सन २००९-२०१० करीता विविध फाईल्स, रजिस्टर, पाकिटे स्टेशनरी साहित्य खरेदीबाबत ई-नि.सु.क्र.१४/२-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार १)मे.भारती एंटरप्रायजेस, तळवडे यांचे ५ बाबी विविध फाईल्स, रजिस्टर, पाकिटे स्टेशनरी साहित्य दर एकुण र.रू.९,३२६/- व २) मे.कापसे एंटरप्रायजेस, पिंपरी वाघेरे यांचे १६ बाबी सदर स्टेशनरीचे एकूण र.रू. १,७०,४९०/- दर स्विकृत करून खरेदीकामी करारनामा करण्यात आलेला असून पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १५) मनपास सन २००९-२०१० करीता विविध स्टेशनरी साहित्य खरेदीबाबत ई-नि.सु.क्र.१४/३-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार १)मे.भारती एंटरप्रायजेस, तळवडे यांचे १७ बाबी विविध स्टेशनरी साहित्य दर र.रू.२,०६,३३०/-, २) मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, चिंचवड यांचे १२ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रू.७८,२००/- व ३)मे.कापसे एंटरप्राजेस पिंपरी वाघेरे याचे १४ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रू.१,२७,७५२/- स्विकृत करून खरेदीकामी करारनामा करण्यात आलेला असून पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १६) मनपास विद्युत विभागासाठी टायमर साहित्य खरेदीबाबत ई-नि.सु.क्र.१०/३-२००९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.धूपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि. पिंपरी यांचे टायमर (निविदेतील ॲटम क्र. १ ते २) साहित्याचे एकुण दर र.रू.३४,१७,०००/- स्विकृत करून खरेदीकामी करारनामा करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/३१९/२०१०
दिनांक : ४/३/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.